| | |
|---|---|
| खटला दाखल तारीख | - १५/०५/२००९ |
| खटला नोंदणी तारीख | - १५/०५/२००९ |
| खटला निकाल तारीख | - ०२/०७/२०२६ |
| कालावधीः | १७ वर्ष ०१ महिने १८ दिवस |

**भाग–'अ'**

**न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, (कोर्ट क्र.३) दौंड, जिल्हा – पुणे.**
**(पिठासीन अधिकारी– जी. एस. बडगुजर)**

**(न्यायनिर्णय दिनांक :– ०२ जुलै, २०२६)**

**संक्षिप्त फौजदारी खटला क्र.३७८/२००९**

**निशाणी क्र.७१**

**(यवत पो.स्टे.अपराध क्र.५८/२००९)**

| | | |
|---|---|---|
| अभियोग पक्ष | : | महाराष्ट्र शासन तर्फे –<br>ठाणे अंमलदार, यवत पोलीस ठाणे, ता. दौंड, जि. पुणे. |
| अभियोग पक्षातर्फे विधीज्ञ | : | विद्वान विशेष सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्रीमती सी.एस.भोसले |
| | **–: विरुध्द :–** | |
| आरोपी | : | बसप्पा येरप्पा चलवादी, वय– ३५ वर्षे, व्यवसाय– वाहन चालक, रा. मुसलीकारलकुंटी, ता. लिंगसूर, जि. रायचूर, (कर्नाटक). |
| बचाव पक्षातर्फे विधीज्ञ | : | विद्वान विधीज्ञ श्री.आर.के.भिसे. |

**दोषारोप– भारतीय दंड संहिता १८६० कलम २७९, ३०४–अ, ३३७, ३३८ व मोटार वाहन अधिनियम, १९८८ चे कलम १८४, १३४(ब) सह १७७ अन्वये.....**

**भाग–'ब'**

| अनु.क्र. | विवरण | दिनांक |
|---|---|---|
| ०१ | गुन्हा घडल्याचा दिनांक | २८/०२/२००९ |
| ०२ | प्रथम खबर अहवाल दिनांक | २८/०२/२००९ |
| ०३ | दोषारोपपत्र दाखल झाल्याचा दिनांक | १५/०५/२००९ |
| ०४ | दोषारोप निश्चिती दिनांक | ३०/०८/२०२४ |

| | | |
|---|---|---|
| ०५ | पुरावा सुरू झाल्याचा दिनांक | १२/१२/२०२४ |
| ०६ | न्यायनिर्णय राखीव केल्याचा दिनांक | -- |
| ०७ | न्यायनिर्णयाचा दिनांक | ०२/०७/२०२५ |
| ०८ | निकाल सुनावनीचा दिनांक | ०२/०७/२०२५ |

## आरोपीचा तपशिल

| श्रेणी | आरोपीचे नांव | अटक दिनांक | जामीन दिनांक | गुन्हयाचे कलम | निर्दोष/ दोषी | शिक्षा सुनावली | बंदीवान म्हणुन असलेला कालावधी फौ.प्र.सं. कलम ४२८ करीता |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | बसप्पा येरप्पा चलवादी | ०१/०३ /२००९ | ०२/०३ /२००९ | भा.दं.सं. कलम २७९, ३०४-अ, ३३७, ३३८ व मोटार वाहन अधिनियम, १९८८ चे कलम १८४, १३४(ब) सह १७७ | निर्दोष | निर्दोष | -- |

## भाग-क

## साक्षीदारांची यादी अभियोग पक्ष/बचाव पक्ष/न्यायालयीन

### अ.अभियोग पक्ष :-

| अनु.क्र. | साक्षीदारांची नांवे | निशाणी | पुराव्याचे स्वरूप |
|---|---|---|---|
| ०१ | इम्रान अजमुद्दीन तांबोळी | २० | घटनास्थळ पंच |
| ०२ | श्रीराम सिताराम देवकर | ४८ | प्रत्यक्षदर्शी साक्षीदार |
| ०३ | विष्णू सोनबा कुदळे | ७० | फिर्यादी |

**ब.बचाव पक्षाचे व न्यायालयीन साक्षीदार जर असतील तर :- निरंक**

**न्यायालय निशाणी कागदपत्रांची यादी :- निरंक**

**ड.अभियोग पक्ष :- निरंक**

**इ.भौतीक वस्तु- निरंक**

## –: न्या य नि र्ण य :–

(घोषित तारीखः ०२ जुलै, २०२६)

१. प्रस्तुत खटल्यात आरोपीविरुध्द भारतीय दंड संहिता, १८६० कलम २७९, ३०४–अ, ३३७, ३३८ व मोटार वाहन अधिनियम, १९८८ चे कलम १८४, १३४(ब) सह १७७ अन्वये शिक्षेसपात्र अपराधाच्या दोषारोपासाठी संपरिक्षा घेण्यात आली.

**अभियोग पक्षाची थोडक्यात हकिकत की:–**

२. दि.२८/०२/२००९ रोजी सकाळी ०५.४५ वाजण्याच्या सुमारास मौजे यवत, ता. दौंड, जि. पुणे गावचे हद्दीत श्रीनाथ ढाब्याचे समोर पुणे–सोलापूर हायवे रोडवर आरोपीने त्याच्या ताब्यातील ट्रक क्र.के.ए.२५–बी–०८७१ हे वाहन मानवी जिवीत धोक्यात येईल अथवा अन्य कोणत्याही व्यक्तीला दुखापत पोहोचण्याचा संभव असेल इतक्या बेदरकारपणे किंवा हयगयीने चालवून सोलापूर बाजूकडून पुण्याकडे जाणारी मारुती झेन कार क्र.एम.एच.१४–ए.ई.–६८५५ या वाहनास समोरा–समोर जोरदार धडक देऊन अपघात घडवून आणला. तसेच सदर मारुती कारमधील बसलेले इसम १) इकबाल अल्लारखु तांबोळी, २) अशपाक बाबुलाल तांबोळी व ३) आरीफ गफुर तांबोळी यांना किरकोळ व गंभीर दुखापती होऊन त्यांच्या सदोष मनुष्यवध सदराखाली न मोडणाऱ्या मृत्यूस कारणीभूत झाला. तसेच आरोपी त्याच्या ताब्यातील वाहन निष्काळजीपणे व भरधाव वेगाने चालवून अपघात करुन उपरोक्त अपघातातील जखमींना वैद्यकीय सुविधा न पुरविता व पोलीसांना घटनेची माहिती न देता घटनास्थळावरुन पळून गेला. त्यामुळे फिर्यादी (सा.क्र.३) यांनी यवत पोलीस ठाण्यात आरोपीविरुद्ध फिर्याद नोंदविली.

३. उपरोक्त आशयाच्या फिर्यादी जबानी रिपोर्टावरुन यवत पोलीस ठाण्यात आरोपीविरुध्द गुन्हा रजिस्टर क्र.५८/२००९ भारतीय दंड संहिता, १८६० कलम २७९, ३०४–अ, ३३७, ३३८ व मोटार वाहन अधिनियम, १९८८ चे कलम १८४, १३४(ब) सह १७७ अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला. सदर गुन्ह्याचा तपास यवत पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक श्री.एस.व्ही.आवताडे यांच्याकडे सोपविण्यात आल्याने त्यांनी

साक्षीदारांचे जबाब नोंदविले, घटनास्थळी जाऊन दिसते परिस्थितीचा पंचनामा केला व तपासाअंती आरोपीविरुध्द पुरावा गोळा झाल्याने न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले.

४. आरोपी न्यायालयात हजर झाल्यानंतर त्याच्याविरूद्ध भारतीय दंड संहिता, १८६० कलम २७९, ३०४–अ, ३३७, ३३८ व मोटार वाहन अधिनियम, १९८८ चे कलम १८४, १३४(ब) सह १७७ अन्वये शिक्षेसपात्र अपराधाचा दोषारोप (नि.क्र.१२) ठेऊन तो आरोपीला त्याच्या बोलीभाषेत वाचून व समजावून सांगितला असता आरोपीने त्याच्या निवेदनात (नि.क्र.१३) गुन्हा कबूल नसल्याचे कथन करून खटल्याची संपरीक्षा घेण्याची विनंती केली. तद्नंतर अभियोग पक्षातर्फे एकूण ०३ महत्वाच्या साक्षीदारांचा पुरावा नोंदविण्यात आला. मात्र सा.क्र.१ ते ३ यांनी अभियोग पक्षाच्या खटल्याला समर्थन केले नाही व ते पूर्णतः फितूर झाले त्यामुळे सरकारी वकिलांच्या तोंडी विनंतीवरून व खटल्याचे वयोमान विचारात घेऊन अभियोग पक्षाचा पुरावा बंद करण्यात आला. आरोपीविरुध्द गुन्हादर्शक पुरावा मिळून आला नाही. त्यामुळे आरोपीला फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ कलम ३१३(१)(ब) अन्वये निवेदन नोंदविण्यापासून सूट देण्यात आली.

५. अभियोग पक्षातर्फे विद्वान विशेष सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्रीमती. सी.एस.भोसले व बचाव पक्षातर्फे विद्वान विधीज्ञ श्री.आर.के.भिसे यांचा युक्तीवाद ऐकला. अभिलेखावरील कागदपत्रांचे व पुराव्याचे बारकाईने अवलोकन केले. खालील मुद्दे खटल्याच्या न्यायनिर्णयासाठी उपस्थित झाले. त्यावर मी कारणांसह पुढीलप्रमाणे निष्कर्ष नोंदविला आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अभियोग पक्ष शाबित करतो काय की, दि.२८/०२/२००९ रोजी सकाळी ०५.४५ वाजण्याच्या सुमारास मौजे यवत, ता. दौंड, जि. पुणे गावचे हद्दीत श्रीनाथ ढाब्याचे समोर पुणे–सोलापूर हायवे रोडवर आरोपीने त्याच्या ताब्यातील ट्रक क्र.के.ए.२५–बी–०८७१ हे वाहन मानवी जिवीत धोक्यात येईल अथवा अन्य कोणत्याही व्यक्तीला दुखापत पोहोचण्याचा संभव असेल इतक्या बेदरकारपणे किंवा हयगयीने चालवून सोलापूर बाजूकडून पुण्याकडे जाणारी | ....नाही. |

| | | |
|---|---|---|
| | मारुती झेन कार क्र.एम.एच.१४–ए.ई.–६८५५ या वाहनास समोरा–समोर जोरदार धडक देऊन अपघात घडवून आणला आणि त्यायोगे भारतीय दंड संहिता, १८६० कलम २७९ अन्वये शिक्षेसपात्र अपराध केला ? | |
| २. | अभियोग पक्ष शाबित करतो काय की, उपरोक्त तारखेस, वेळी व ठिकाणी आरोपीने त्याच्या ताब्यातील उपरोक्त वाहन मानवी जिवीत धोक्यात येईल अथवा अन्य कोणत्याही व्यक्तीला दुखापत पोहोचण्याचा संभव असेल इतक्या बेदरकारपणे किंवा हयगयीने चालवून सोलापूर बाजूकडून पुण्याकडे जाणारी मारुती झेन कार क्र.एम.एच.१४–ए.ई.–६८५५ या वाहनास समोरा–समोर जोरदार धडक देऊन सदर मारुती कारमधील बसलेले इसम १) इकबाल अल्लारखु तांबोळी, २) अशपाक बाबुलाल तांबोळी व ३) आरीफ गफुर तांबोळी यांच्या सदोष मनुष्यवध सदराखाली न मोडणाऱ्या मृत्युस कारणीभूत झाला आणि त्यायोगे भारतीय दंड संहिता, १८६० कलम ३०४–अ अन्वये शिक्षेसपात्र अपराध केला ? | ....नाही. |
| ३. | अभियोग पक्ष शाबित करतो काय की, उपरोक्त तारखेस, वेळी व ठिकाणी आरोपीने त्याच्या ताब्यातील उपरोक्त वाहन मानवी जिवीत धोक्यात येईल अथवा अन्य कोणत्याही व्यक्तीला दुखापत पोहोचण्याचा संभव असेल इतक्या बेदरकारपणे किंवा हयगयीने चालवून सोलापूर बाजूकडून पुण्याकडे जाणारी मारुती झेन कार क्र.एम.एच.१४–ए.ई.–६८५५ या वाहनास समोरा–समोर जोरदार धडक देऊन सदर मारुती कारमधील बसलेले इसम १) तौसिफ रफिक तांबोळी व २) इमरान इक्बाल तांबोळी यांच्या किरकोळ व गंभीर दुखापतीस कारणीभूत झाला आणि त्यायोगे भारतीय दंड संहिता, १८६० कलम ३३७ व ३३८ अन्वये शिक्षेसपात्र अपराध केला ? | ....नाही. |
| ४. | अभियोग पक्ष शाबित करतो काय की, उपरोक्त तारखेस, वेळी व ठिकाणी आरोपीने मानवी जीवीत किंवा इतरांची व्यक्तीगत सुरक्षितता धोक्यात येईल इतक्या बेदरकारपणे किंवा तसेच रस्त्याच्या परिस्थितीकडे दुर्लक्ष करुन त्याच्या ताब्यातील उपरोक्त वाहन धोकादायकरित्या चालवले आणि त्यायोगे मोटर वाहन अधिनियम, १९८८ चे कलम १८४ अन्वये शिक्षेसपात्र अपराध केला ? | ....नाही. |
| ५. | अभियोग पक्ष शाबित करतो काय की, उपरोक्त तारखेस, वेळी व ठिकाणी आरोपीने त्याच्या ताब्यातील उपरोक्त वाहन निष्काळजीपणे व भरधाव वेगाने चालवून अपघात करुन उपरोक्त | ....नाही. |

| | | |
|---|---|---|
| | अपघातातील जखमींना वैद्यकीय सुविधा न पुरविता व पोलीसांना घटनेची माहिती न देता घटनास्थळावरुन पळून गेला आणि त्यायोगे मोटर वाहन अधिनियम, १९८८ चे कलम १३४(ब) सह १७७ अन्वये शिक्षेसपात्र अपराध केला ? | |
| ६. | अंतीम आदेश काय ? | ...अंतीम आदेशाप्रमाणे |

## का र ण मि मां सा

६. प्रस्तुत खटल्यात- आरोपीने त्याच्या ताब्यातील वाहन मानवी जिवीत धोक्यात येईल अथवा अन्य कोणत्याही व्यक्तीला दुखापत पोहोचण्याचा संभव असेल इतक्या बेदरकारपणे किंवा हयगयीने चालवून सोलापूर बाजूकडून पुण्याकडे जाणारी मारुती झेन कार क्र.एम.एच.१४-ए.ई.-६८५५ या वाहनास समोरा-समोर जोरदार धडक देऊन अपघात घडवून आणल्याचे, सदर मारुती कारमधील बसलेले इसम १) तौसिफ रफिक तांबोळी व २) इमरान इक्बाल तांबोळी यांच्या किरकोळ व गंभीर दुखापतीस कारणीभूत झाल्याचे तसेच सदर मारुती कारमधील बसलेले इसम १) इकबाल अल्लारखु तांबोळी, २) अशपाक बाबुलाल तांबोळी व ३) आरीफ गफुर तांबोळी यांच्या सदोष मनुष्यवध सदराखाली न मोडणाऱ्या मृत्युस कारणीभूत झाल्याचे व त्याच्या ताब्यातील वाहन निष्काळजीपणे व भरधाव वेगाने चालवून अपघात करुन उपरोक्त अपघातातील जखमींना वैद्यकीय सुविधा न पुरविता व पोलीसांना घटनेची माहिती न देता घटनास्थळावरुन पळून गेल्याचे तथ्य वाजवी संशयापलिकडे जाऊन निर्विवादपणे सिध्द करण्याची जबाबदारी अभियोग पक्षाच्या खांद्यावर आहे. त्या अनुषंगाने अभिलेखावरील तोंडी व कागदोपत्री पुराव्याचे बारकाईने अवलोकन करणे आवश्यक आहे.

७. आरोपीविरुध्द ठेवण्यात आलेल्या उपरोक्त दोषारोप सिध्द करण्यासाठी अभियोग पक्षाने एकूण ०३ साक्षीदारांच्या तोंडी पुराव्यावर भिस्त ठेवली. त्यात घटनास्थळ पंच म्हणून इम्रान अजमुद्दीन तांबोळी (सा.क्र.१) यांची नि.क्र.२० वर, प्रत्यक्षदर्शी साक्षीदार म्हणून श्रीराम सिताराम देवकर व फिर्यादी म्हणून विष्णू सोनबा कुदळे (सा.क्र.२ व ३)

यांची अनुक्रमे नि.क्र.४८ व ७० वर साक्ष नोंदविली आहे. फिर्यादी (सा.क्र.३) व सा.क्र.१ व २ यांनी अभियोग पक्षाच्या खटल्याला समर्थन केले नाही. त्यामुळे विद्वान विशेष सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांच्या तोंडी विनंतीवरुन व खटल्याचे वयोमान विचारात घेऊन अभियोग पक्षाचा पुरावा बंद करण्यात आला.

**<u>मुद्दा क्र.१ ते ५ करिताः–</u>**

८. मुद्दा क्र.१ ते ५ एकमेकांशी संलग्न असल्याने पुराव्याची पुनरावृत्ती टाळण्यासाठी त्यांचा निष्कर्ष एकत्रितरित्या नोंदविला आहे.

९. घटनास्थळ पंच (सा.क्र.१) यांनी त्यांच्या तोंडी पुराव्यात असे कथन केले आहे की, दि.२८/०२/२००९ रोजी त्यांना यवत पोलिसांनी त्यांचे नातेवाईक अश्पाक, आरीफ व इक्बाल तांबोळी यांचा अपघात झाल्याने पंचनाम्यावर सही करण्यासाठी पोलीस ठाण्यात बोलवले होते, मात्र त्यादिवशी ते पोलीसांसोबत कोठेही गेलो नव्हते, पोलीसांनी त्यांच्यासमक्ष कुठलाही पंचनामा केला नव्हता व नकाशा काढला नव्हता, त्यादिवशी त्यांनी पोलीसांच्या सांगण्यावरुन पंचनाम्यावर सही केली होती.

१०. सा.क्र.२ यांनी त्यांच्या तोंडी पुराव्यात असे कथन केले आहे की, फिर्यादी त्यांच्या गावात राहत असल्याने ते त्यांना ओळखतात, त्यांना फिर्यादीसोबत काय घटना घडली होती ते माहीत नाही, पोलिसांनी त्यांचा जबाब नोंदविला नव्हता, त्यांनी एक अपघात पाहिला होता व त्यात पाच इसम मयत झाले होते असे घडले नव्हते.

११. फिर्यादी (सा.क्र.३) यांनी त्यांच्या तोंडी पुराव्यात असे कथन केले आहे की, त्यांचे यवत गावात एम.एस.ई.बी. बोर्डाजवळ श्रीनाथ बिर्याणी हाऊस नावाने हॉटेल आहे, त्यांना घटनेची तारीख व वर्ष आठवत नाही, त्यांना घटनेबद्दल काहीही आठवत नाही, त्यांनी पोलीस स्टेशनला अपघाताची फिर्याद नोंदविल्याचे त्यांना आठवत नाही.

१२. फिर्यादी (सा.क्र.३) व सा.क्र.१ व २ हे अभियोग पक्षाच्या खटल्याला फितूर होऊन त्यांनी अभियोग पक्षाच्या खटल्याचे समर्थन केले नाही. त्यामुळे विद्वान विशेष सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांनी त्यांचा कसून उलटतपास घेतला. मात्र अभियोग पक्षाला उपयुक्त ठरु शकेल असा भक्कम पुरावा पटलावर आला नाही.

१३. या ठिकाणी नमूद करण्यासारखी बाब म्हणजे आरोपीने १) इकबाल अल्लारखु तांबोळी, २) अशपाक बाबुलाल तांबोळी व ३) आरीफ गफुर तांबोळी यांचे मरणोत्तर पंचनामे, शव तपासणी फॉर्म (नि.क्र.३० ते ३५), शव विच्छेदन प्रमाणपत्र (नि.क्र.३६ ते ३८), वैद्यकीय प्रमाणपत्रे (नि.क्र.३९ व ४०), अपघात अहवाल (नि.क्र.४१ व ४२), शव विच्छेदन अहवाल (नि.क्र.४३ ते ४५) असे कागदपत्र मान्य केले आहेत.

१४. उपरोक्त तोंडी व कागदोपत्री पुराव्याचे बारकाईने अवलोकन केले असता सदर अपघातात अपघातग्रस्थ मारुती कारमधील बसलेले इसम १) तौसिफ रफिक तांबोळी व २) इमरान इक्बाल तांबोळी यांना किरकोळ व गंभीर तसेच १) इकबाल अल्लारखु तांबोळी, २) अशपाक बाबुलाल तांबोळी व ३) आरीफ गफुर तांबोळी यांचा अपघाती मृत्यू झाल्याचे तथ्य पटलावर आले आहे. मात्र अपघातास कारणीभूत असलेले वाहन आरोपीच चालवित होता असा भक्कम पुरावा घटनास्थळ पंच, प्रत्यक्षदर्शी साक्षीदार व फिर्यादी (सा.क्र.१ ते ३) यांनी अभियोग पक्षाच्या खटल्याला समर्थन केलेले नसल्याने पटलावर येऊ शकलेला नाही. फिर्यादी (सा.क्र.३) हे अभियोग पक्षाच्या खटल्याला फितूर झाल्याने घटनेची फिर्याद देखील सिद्ध झालेली नाही. त्यामुळे घटनेच्या वेळी व ठिकाणी आरोपीनेच त्याच्या ताब्यातील वाहन बेदरकारपणे अथवा हयगयीने भरधाव वेगात धोकादायकरित्या चालवून अपघात घडवून आणल्याचे तथ्य वाजवी संशयापलिकडे जाऊन निर्विवादपणे सिध्द होण्याइतपत भक्कम पुरावा पटलावर आलेला नाही. त्यामुळे आरोपीविरुध्द ठेवण्यात आलेल्या दोषारोपातील एकही घटक वाजवी संशयापलीकडे जाऊन निर्विवादपणे ठोस व भक्कम पुराव्याअभावी सिध्द झालेला नाही. त्यामुळे आरोपी सबळ पुराव्याअभावी संशयाच्या

बळावर खटल्यातून निर्दोष मुक्त होण्यास पात्र ठरला आहे. त्यामुळे मी मुद्दा क्र.१ ते ५ चा निष्कर्ष नकारार्थी नोंदविला आहे व क्र.६ च्या उत्तरादाखल पुढीलप्रमाणे आदेश पारित करित आहे :

**–: आ दे श :–**

१. आरोपी– बसप्पा येरप्पा चलवादी यांची फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ कलम २५५ (१) अन्वये भारतीय दंड संहिता, १८६० कलम २७९, ३०४–अ, ३३७, ३३८ व मोटार वाहन अधिनियम, १९८८ चे कलम १८४, १३४(ब) सह १७७ अन्वये शिक्षेसपात्र अपराधातून निर्दोष मुक्तता करण्यात येते.

२. आरोपी यांचे पुर्वीचे जामीनबंधपत्र रद्द करण्यात येत आहे.

३. अभियोग पक्षाने प्रस्तुत निकालाविरुध्द, मा. वरिष्ठ न्यायालयात दाद मागितल्यास, आरोपी हे नोटीस मिळताच स्वतःहून हजर राहतील याचे खात्रीसाठी, आरोपीने आजपासून सहा महिनेचे कालावधी करिता, फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७–अ (१) [भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ चे कलम ४८०] अन्वये पुर्तता करावी.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषित करण्यात आला.)

Digitally signed by BADGUJAR GAJANAN SHIVDAS
Date: 2026.07.02 16:17:17 +0530

(जी.एस.बडगुजर)
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
(कोर्ट क्र.३) दौंड.

दिनांक : ०२/०७/२०२६.

## CERTIFICATE

**I affirm that the contents of this P.D.F file Judgment/Order are same word to word, as per the original Judgment/Order.**

| | |
|---|---|
| Name of Stenographer | Shri. S. B. Khule (L.G.) |
| Name of Court | 3rd Jt. CJJD & JMFC, Daund, Dist. Pune. |
| Date of Dictation | 02/07/2026. |
| Judgment/Order signed by the PO on | 02/07/2026. |
| Judgment /Order uploaded on | 02/07/2026. |